**प्रशासकिय ईमारत जिल्हा परिषद, वाशिम**
**आयएसओ ९००१:२००८ मानांकित कार्यालय**
**जिल्हाधिकारी कार्यालय समोर वाशिम ४४४ ५०५**

**दुरध्वनी क्रमांक ०७२५२-२३२८६२** **फॅक्स :- ०७२५२-२३३६९८**
**ईमेल आयडी :- dyceozpwashim@gmail.com**

---

**कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी यांनी कार्यालयात वावरतांना पाळावयाचे शिस्ती बाबत, कार्यालयीन कामकाजाबाबत.**

सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद वाशिम
परिपत्रक क्रमांक जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-१/ ८९८ /२०१८
दिनांक २७ फेब्रुवारी २०१८

**प्रस्तावणा :-**

जिल्हा परिषदेमध्ये विविध विभागामधील नस्ती मंजुरी करीता सादर करतांना विभाग प्रमुख , खाते प्रमुख नस्तीवर स्पष्ट अभिप्राय नोदवुन सादर करित नाही तसेच सदर नस्ती अवलोकनार्थ सादर करतात अशा मोघम नस्ती सादर करतात त्यामुळे नस्तीवर निर्णय घेण्यास अडचणी येते, .त्याच प्रमाणे सादर केलेल्या नस्तीमध्ये सामान्य प्रशासन विभाग यांचे परिपत्रक दिनांक १७ ऑक्टोबंर २०१५ टिपणी लेखन केल्यानंतर त्या खाली स्वाक्षरी करणे पुर्वी संबधित कर्मचारी / अधिकारी यांनी स्वत:चे नाव ,पदनाम व दिनांक नमुद करणे बाबत कार्यवाही आवश्यक असताना सदर परिपत्रकानुसार कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच जिल्हा परिषद मुख्यालयामध्ये वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा-यांची बायोमॉट्रीक थम मशिन मध्ये हजेरी घेतल्याचे दिसुन आले आहे .सदर बायोमॉट्रीक थम मशिन मध्ये वर्ग १ ते वर्ग ४ च्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती होणे आवश्यक आहे.त्याच प्रमाणे जिल्हा परिषद मध्ये विविध विभागामधिल कार्यरत अधिकारी , कर्मचारी हे कार्यालयीन वेळेमध्ये जिन्स पॅन्ट, टि शर्ट व स्पोर्ट शुज घालुन कार्यालयात उपस्थीत होत असल्याचे दिसुन आले आहे. त्यामुळे कार्यालयात विविध विभागामध्ये कामकानिमीत्य येणाऱ्या जनतेमध्ये कार्यालयाची प्रतीमा चुकीची जात असल्याचे दिसुन आले आहे. पर्यायाने त्यामध्ये कार्यालयाचे प्रतीमा मलीन होत आहे. तसेच कार्यरत वाहन चालक व वर्ग ४ चे परीचर वर्ग हे शासनाने नेमुन दिलेल्या गणवेशात कार्यालयास उपस्थीत राहत नसल्याचे आढळुन आले आहे.तसेच कार्यरत अधिकारी , व कर्मचारी हयांनी नियमीतपणे कार्यालयात वावरत असतांना / कार्यालयात कामकाज करीत असतांना ओळखपत्र ठेवणे बंधनकारक असतांनाही अधिकारी व कर्मचारी हे विना ओळखपत्राचे कार्यालयात वावरतांना दिसुन आले. करिता याबाबत खालील सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**परिपत्रक:-**

विभागामधुन टिपणी सादर करतांना संबंधित लिपीकाने टिपणी मसुदा लेखनामधिल तरतुदी नुसार टिपणी मध्ये विषयाचे अनुषगांने शासन निर्णय, अधिनियम नमुद करुन त्यांचे स्पष्ट अभिप्राय देऊनच टिपणी सादर करावी त्यानंतर टिपणी छाननी करणारे कनिष्ठ प्रशासन अधिकारी / सहाय्यक प्रशासन अधिकारी / सहाय्यक लेखा अधिकारी/ लेखा अधिकारी यांनी संपुर्ण संचीकेची छाननी करुन शासन निर्णयानुसार,नियमानुसार कोणती कार्यवाही / निर्णय घेणे आवश्यक आहे याबाबत स्पष्ट अभिप्राय नोंदऊनच

टिपणी विभाग प्रमुखाकडे सादर करावी. त्यावर विभाग प्रमुख यांनी अंतिम निर्णय घेतांना नियमाप्रमाणे योग्य कार्यवाही करणे अपेक्षीत आहे . ज्या संचीकेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडुन मान्यतेची आवश्यकता आहे, त्या संचीका आपल्या स्पष्ट अभिप्रायासह कोणती कार्यवाही / निर्णय घेणे योग्य आहे या बाबत स्पट पणे लिहणे आवश्यक आहे. सदर टिपणीसोबत अधिनियम, शासन निर्णय, परीपत्रक, इत्यादी बांबी नमुद करुन सदर नस्तीमध्ये / टिपणी मध्ये उल्लेख केलेले महत्वाचे कागदपत्रे कोणत्या पृष्ठावर आहे त्याचा पृष्ठ क्रमांक मार्जीन मध्ये त्या कागदपत्राचा उल्लेख समोर लिहण्यात यावा, व टिपणी लेखक केल्यानंतर सामान्य प्रशासन विभाग शासन परीपत्रक क्रमांक संकीर्ण२०१५/प्र.क्र.१२९/१८ दिनांक १७ ऑक्टोंबर २०१५ मध्ये नमुद केल्यानुसार स्वाक्षरी करण्यापुर्वी स्वत:चे नाव, पदनाम, व दिनांक स्पष्ट पणे नमुद करावा.

जिल्हा परीषद मुख्यालयात कार्यान्वीत असलेली बायोमॅट्रीक थम मशिन मध्ये कार्यरत वर्ग-१ ते वर्ग ४ च्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे नावाची नोदणी करुन सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे थम बायोमॅट्रीक थम मशिन मध्ये नोदवुन नियमीतपणे उपस्थीत घ्यावी. कार्यालय प्रमुख यांनी दरमहा उपस्थीती बाबत अहवाल प्राप्त करुन त्यानुसारच वेतन व भत्ते अदा करण्याची कार्यवाही करावी.

त्याप्रमाणे जिल्हा परीषद वाशिम अंतर्गत कार्यालयातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांनी या परीपत्रकाचे दिनांकापासुन कोणत्याही परीस्थीतीत जिन्स पॅन्ट, टि शर्ट व स्पोर्ट शुज परीधान करुन कार्यालयीन वेळेमध्ये कार्यालयात उपस्थीत राहु नये, या नंतर सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनी साध्या पोशाखात ( शर्ट व पॅन्ट) मध्ये ओळखपत्रासह कार्यालयात उपस्थीत राहुन नियमीतपणे ओळखपत्र कार्यालय संपेपर्यत बाट्‌णे आवश्यक राहील , तसेच वाहन चालक व परीचर यांनी नेमुन दिलेल्या गणेवशात उपस्थीत राहणे बंधनकारक राहील.

उपरोक्त प्रमाणे दिलेल्या सूचना चे काटेकोर पणे पालन करण्यात यावे . सदर परिपत्रकाचे उल्लघंन करण्या-या संबंधित अधिकारी / कर्मचा-याविरुध्द, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील )नियम १९७९ व महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे कलमानुसार एकतर्फी शिस्त विषयक कार्यवाही करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

सदरच्या परिपत्रकाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद ,वाशिम**

प्रति,

१) खाते प्रमुख - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - जि.प.वाशिम
२) गटविकास अधिकारी पंचायत समिती - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - (सर्व)
३) सहाय्यक गटविकास अधिकारी पंचायत समिती - - - - - - - - - - - - - - - - - -(सर्व)
४) गटशिक्षणाधिकारी ,पंचायत समिती सर्व - - - - - - - - - - - - - - - - - - - - --(सर्व)
५) बाल विकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो. - - - - - - - - - - - - - - - - - - (सर्व)
६) कार्यालय प्रमुख - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - (सर्व)

यांना माहिती व वरील प्रमाणे तात्काळ कार्यवाहीकरीता.

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद ,वाशिम**

**विषय :- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती , अधिनियम १९६१ चे कलम ९६ मधील तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारांचे प्रत्यायोजन**

सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद वाशिम
परिपत्रक क्रमांक जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-१/9356/२०१८
दिनांक :-29 मार्च २०१८

वाचा :-१. सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रमांक - वैखप्र -२०१६ / प्र.क्र. १६/ २०१६/राकावि २ मंत्रालय मुबई दिनांक १६ मार्च २०१६
२.महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९६ (१)

**-: आदेश :-**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९६ मधील तरतुदीनुसार प्रदान करणेत आलेल्या ,मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारापैकी काही महत्वाचे अधिकार या आदेशान्वये प्रत्यायोजित करण्यात येत आहे.प्रत्यायोजन कार्यपध्दती बाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रमांक - वैखप्र २०१६/प्र.क्र. १६/२०१६ राकावि -२ मंबई दिनांक १६ मार्च २०१६ अन्वये सुधारित तरतुदीनुसार वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्त्ती रु. ३,००,०००/- ( अक्षरी रु.तीन लाक्ष फक्त ) पर्यत मंजुरीचे अधिकार या आदेशाव्दारे अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ,वाशिम यांना याव्दारे प्रदान करण्यात येत आहे. सदर आदेश हा मागील वैद्यकीय देयकांना मंजुरीसाठी देखील लागू राहील. तसेच यापुर्वीचे विहीत केलेली कार्यपध्दती अवलंबवावी ( जसे. जिल्हा आरोग्य यांचे तांत्रिक सल्यानुसार व वित्त विभागाच्या पडताळणी नुसार )

अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी प्रकरणांना मंजुरी देताना महाराष्ट्र राज्य सेवा ( वैद्यकिय देखभाल ) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतूदी काटेकोरपणे तपासुन मंजुरी देण्यात यावी.

वरील प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारामध्ये कोणत्याही वेळी कोणत्याही कारणास्तव बदल करण्याची किंवा काढुन घेण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.प्रस्तुत आदेश **स्थायी आदेश** संचीकेत सामील करावा.

प्रस्तुत आदेशाची अमलबजावणी , आदेशाच्या दिनांकापासुन करण्यात यावी.

Deepa
16/03/18

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद ,वाशिम**

**प्रतिलिपी :-**

१) मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांना माहीती करीता सादर.
२) अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

३) प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि. यंत्रणा ,वाशिम यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
४) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि.प.वाशिम यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
५) मुख्य लेखा वित्त अधिकारी जि.प.वाशिम यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
६) खाते प्रमुख - - - - - - - - - - - - -- - (सर्व) जि.प.वाशिम यांना माहीती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.
७) गट विकास अधिकारी / सहा. गट विकास अधिकारी पं.स.- - - - - -- - - - - - - - - - - (सर्व) यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
८) बाल विकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो.- - - - - - - - (सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.
९) उप अभियंता जि.प.बांधकाम/ल.सि./ग्रा.पा.पु. उप विभाग - - - -- - - - - - - - - - (सर्व) यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
१०) गट शिक्षणाधिकारी पं.स. - - -- - - - - - - - (सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.
११) वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.के.- - - - - - - ----- - - - - - - (सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.
१२) मुख्याध्यापक जिल्हा परिषद हायस्कुल - - - - - - - - - - - (सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.
१३) तालुका आरोग्य अधिकारी - - - - - - - - - - - - - - - - -(सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.

16/03/18

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,वाशिम

प्रतिभा राऊत
व.सहा. आस्थापना-१
सा.प्र.वि. जि.प.वाशिम

**विषय :- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती , अधिनियम १९६१ चे कलम ९६ मधील तरतुदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारांचे प्रत्यायोजन**

सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद वाशिम
परिपत्रक क्रमांक जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-१/९६०२/२०१८
दिनांक :- मार्च २०१८ ४/४/१८

वाचा :-१. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ५० व ६१
२.महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९६ (१)

**-: आदेश :-**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ चे कलम ९६ मधील तरतुदीनुसार प्रदान करणेत आलेल्या ,मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारापैकी काही महत्वाचे अधिकार या आदेशान्वये प्रत्यायोजित करण्यात येत आहे.प्रत्यायोजन कार्यपध्दती बाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ५० व ६१ नुसार वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा-यांचे ३० दिवसा पर्यत अर्जित रजा व ३० (६० अर्धवेतनी ) दिवसांची परावर्त्तीत रजा आजारी कारणास्तव मंजुरीचे अधिकार या आदेशाव्दारे खाते प्रमुख , विभाग प्रमुख ,गट विकास अधिकारी व कार्यालय प्रमुख यांना याव्दारे प्रदान करण्यात येत आहे. सदर आदेश हा मागील रजा प्रकरणा करिता मंजुरीसाठी देखील लागू राहील.

खाते प्रमुख , विभाग प्रमुख ,गट विकास अधिकारी व कार्यालय प्रमुख यांनी प्रकरणांना मंजुरी देताना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतूदी काटेकोरपणे तपासुन मंजुरी देण्यात यावी.

वरील प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारामध्ये कोणत्याही वेळी कोणत्याही कारणास्तव बदल करण्याची किंवा काढुन घेण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.प्रस्तुत आदेश **स्थायी आदेश** संचीकेत सामील करावा.

प्रस्तुत आदेशाची अमलबजावणी , आदेशाच्या दिनांकापासुन करण्यात यावी.

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद ,वाशिम**

o/c

**प्रतिलिपी :-**

१) मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांना माहीती करीता सादर.
२) अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
३) प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि. यंत्रणा ,वाशिम यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
४) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि.प.वाशिम यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
५) मुख्य लेखा वित्त अधिकारी जि.प.वाशिम यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

६) खाते प्रमुख - - - - - - - - - - - - -- - (सर्व) जि.प.वाशिम यांना माहीती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

७) गट विकास अधिकारी / सहा. गट विकास अधिकारी पं.स.- - - - -- - - - - - - - - - - (सर्व) यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

८) बाल विकास प्रकल्प अधिकारी ए.बा.वि.से.यो.- - - - - - - - (सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.

९) उप अभियंता जि.प.बांधकाम/ल.सि./ग्रा.पा.पु. उप विभाग - - - -- - - - - - - - - - (सर्व) यांना माहीती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

१०) गट शिक्षणाधिकारी पं.स. - - -- - - - - - - - - (सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.

११) वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.के.- - - -- - - ----- - - - - - - (सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.

१२) मुख्याध्यापक जिल्हा परिषद हायस्कुल - - - - - - - - - - - (सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.

१३) तालुका आरोग्य अधिकारी - - - - - - - - - - - - - - - - -- -(सर्व) यांना माहीती व कार्यवाहीस्तव.

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,वाशिम

व.सहा.आस्थापना
सा.प्र.वि.,जि.प.वाशिम

उप.मु.का.अ.(सा.)
जि.प.वाशिम

**प्रशासकिय ईमारत जिल्हा परिषद, वाशिम**
आयएसओ ९००१:२००८ मानांकित कार्यालय
जिल्हाधिकारी कार्यालय समोर वाशिम ४४४ ५०५
दुरध्वनी क्रमांक ०७२५२-२३२८६२ फॅक्स :- ०७२५२-२३३६९८
ईमेल आयडी :- dyceozpwashim@gmail.com

---

**विनापरवानगी जि.प.मुख्यालयात अधिकारी / कर्मचारी यांनी न येणे बाबत.**

परिपत्रक
सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद वाशिम
परिपत्रक क्रमांक जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-२/ १२८ /२०१८
दिनांक २२ फेब्रुवारी २०१८

माझे असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषद मुख्यालयात एकुण १५ विभाग असुन खाते प्रमुख / गटविकास अधिका-यांना जिल्हा परिषद मुख्यालयात बैठकीसाठी बोलावत असतात त्यामुळे गटविकास अधिकारी यांनाही गट स्तरावरील विकास कामाकडे लक्ष देणेस पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे त्याचा विपरीत परिणाम विकास कामावर होतो. तरी याव्दारे कळविण्यात येते की, यापुढे गटविकास अधिकारी यांना आढावा बैठकीसाठी उपस्थित राहणेसाठी बोलविणे अत्यंत आवश्यक असेल तर माझे लेखी परवानगी घेतल्या शिवाय बोलविण्यात येवु नये.

तसेच गट स्तरावरील बरेचशे गट क व, गट ड संवर्गातील कर्मचारी हे रोज जिल्हा परिषद मुख्यालयात विभागात व इतरस्त्र फिरतांना दिसतात यापुढे नियमित टपाल घेवुन येणा-या गट ड कर्मचारी यांचे व्यतिरिक्त गटविकास अधिकारी यांची पुर्व परवानगी शिवाय कोणत्याही कर्मचा-यास जिल्हा परिषद मुख्यालयात पाठवु नये. तसेच खाते प्रमुखांनी आवश्यकता असल्यास गटस्तरावरील कर्मचारी यांना बोलवावे.

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,वाशिम

प्रती,
१) खाते प्रमुख - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - जि.प.वाशिम
२) गटविकास अधिकारी पंचायत समिती - - - - - - - - - - - - - (सर्व)

**प्रत : माहितीसाठी सविनय सादर.**
१) मा.अध्यक्षा / मा.उपाध्यक्ष जिल्हा परिषद वाशिम यांचे वैयक्तिक कार्यालय.
२) मा.सभापती - - - - - - - - - - - - विषय समिती जि.प.वाशिम यांचे वैयक्तिक कार्यालय

२२/०२
(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,वाशिम

**प्रशासकिय ईमारत जिल्हा परिषद, वाशिम**
आयएसओ ९००१:२००८ मानांकित कार्यालय
जिल्हाधिकारी कार्यालय समोर वाशिम ४४४ ५०५

दुरध्वनी क्रमांक ०७२५२-२३२८६२
फॅक्स :- ०७२५२-२३३६९८
ईमेल आयडी :- dyceozpwashim@gmail.com

---

**शासकिय / निमशासकिय कार्यालयासह सार्वजनीक ठिकाणी थुंकणे / धुम्रपान करणे असे कृत्य करुन कलमाचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक कार्यवाही करणे बाबत.**

## परिपत्रक

सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद वाशिम
परिपत्रक क्रमांक जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-१/ 623 /२०१८
दिनांक २२ फेब्रुवारी २०१८

**संदर्भ :-१)** केद्र शासनाच्या सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध,व्यापार विनियमन आणि वाणिज्य उत्पादन, पुरवठा आणि वितरण ) कायदा २००३

२) सार्वजनीक आरोग्य विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक तंबाखू २०१४/प्र.क्र.१५९/ आरोग्य -५ दिनांक १६ जुलै २०१४

**उपरोक्त** केद्र शासनाचे कायदा २००३ च्या तरतुदीत व शासनाचे आरोग्य विभागाचे शासन परिपत्रकातील तरतुदीचे अनुषंगाने सार्वजनीक ठिकाणी थुंकण्यावर व धुम्रपानावर प्रतिबंध आहे. लोकांच्या आरोग्याच्या हितासाठी स्वादिष्ट ,सुगंधित तंबाखू ,स्वादिष्ट,सुगंधित सुपारी यांची निर्मीती, साठवण वितरण किंवा विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

सार्वजनीक ठिकाणी धुम्रपानावर आणि थुंकण्यावर,वरील अधिनियमान्वये प्रतिबंध असला तरी सार्वजनीक ठिकाणी थुंकण्याचे आणि धुम्रपान करण्याचे प्रमाण कमी झालेले दिसत नाही. थुंकण्यामध्ये सार्वजनीक मालमत्ता विद्रुप होते. तसेच नागकरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. उपरोक्त अधिनियमातील कलम २१ तरतुदीनुसार सार्वजनीक ठिकाणी धुम्रपान करणा-या व्यक्तीस रुपये २००/- प्रमाणे दंडात्मक कार्यवाहीची तरतुद आहे.

वरिल अधिनियमातील व शासन परिपत्रकातील तरतुदीचे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिने वाशिम जिल्हा परिषद मुख्यालय/ कार्यालय सर्व पंचायत समिती कार्यालये व अधिनस्त असलेले विभाग या ठिकाणी थुंकण्यावर व धुम्रपानावर प्रतिबंध असुन या कायदयातील तरतूदीचे उल्लंघन करणा-या कोणत्याही कर्मचारी/व्यक्तीवर दंडात्मक कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येईल. हे परिपत्रक सर्व कर्मचा-यांचे निदर्शनास आणून देण्यात यावे. तसेच प्रत्येक कार्यालयाचे दर्शनी भागात सार्वजनीक ठिकाणी थुंकण्यावर व धुम्रपानावर प्रतिबंध आहे. उल्लंघन केल्यास रुपये २००/- ची दंडात्मक कार्यवाही केली जाईल असे नोटीस बोर्ड लावण्यात यावे.

यापुढे वरील अधिनियमातील तरतूदीचे व परिपत्रकातील सुचनांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास सबंधिता विरुध्द कलमातील तरतूदीनुसार दंडात्मक कार्यवाही सबंधित विभागाचे कार्यालय प्रमुख / खाते प्रमुख यांनी करावी.

(दीपक कुमार मीना) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,वाशिम

प्रति,

१. मा.अध्यक्षा,मा.उपाध्यक्ष जि.प.वाशिम यांना माहिती करिता सविनय सादर.
२. मा.सभापती ---------------------- समिती जि.प.वाशिम यांना माहिती करिता सविनय सादर.
३. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी ,जि.प.वाशिम यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.
४. खाते प्रमुख - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - जि.प.वाशिम
५. गटविकास अधिकारी पंचायत समिती - - - - - - - - - - - - - - - (सर्व)

(दीपक कुमार मीना) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ,वाशिम